**पळवाट**

मी पहिले न मागे
वाटेत अंधार होता
पुढचा प्रकाश मात्र
जास्ती भयाण होता

पाऊल जागचे हे
सावलीत अडकले
उजळल्या काळरात्री
काजवे पांगलेले

मोकाट त्या दिव्यांचे
नि:शब्द भय पसरे
हेलकावे फांदीतूनी
काही गूढ गहिरे

माझ्याच सोबतीला
जागले मढे-पाखरू
कुजबुज चांदण्यांची
अवेळीच का सुरु?

आता उजाडलेले
सारे उजाड दिसले
माझे रहस्य तिकडे
अस्वस्थ झाकलेले

**संध्या रानडे**